| | नियमित दिवाणी दावा क्रमांक ४१/२०२०<br>पांडूरंग संभाजी रणपिसे व इतर<br>विरुध्द<br>तानाजी बाजीराव रणपिसे व इतर |
|---|---|

## निशाणी १२ वरील आदेश

प्रस्तूतचा अर्ज वादी यांनी सदर दाव्यातील प्रतिवादी क्रमांक ५ यांचे नाव दाव्यातून कमी करण्यात येऊन त्याप्रमाणे दावा दुरूस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांच्या कथनानुसार प्रस्तूतचा दावा दावामिळकतीतील अतिक्रमण काढून मागणेसाठी दाखल केला आहे. सदर अर्जात वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, दाव्यातील प्रतिवादी क्रमांक ५ यांना दावासमन्स पाठवले असता ते मयत असल्याचा अहवाल न्यायालयात दाखल झाला आहे. सबब, प्रतिवादी क्रमांक ५ विरूध्द वादी यांना कोणतीही दाद मागावयाची नाही. सबब, दाव्याचे सरनाम्यातून नमुद प्रतिवादी क्रमांक ५ यांचे नाव कमी करण्यात येऊन त्यांच्या नावासमोर "मयत" असा उल्लेख करून त्याप्रमाणे दुरूस्ती करण्यात यावी अशी वादीने विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांना पुरेशी संधी देऊनही त्यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले नाही. सबब, सदर अर्जावर प्रतिवादी यांचे म्हणणे नाहीचा आदेश पारित करण्यात येऊन अर्ज पुढे चालविण्यात आला.

४. वादीचे विद्वान विधीज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. संपुर्ण प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्तूतचा दावा हा दावामिळकतीतील अतिक्रमण काढून मागणेसाठी दाखल केला असुन मौल्यवान स्थावर मिळकतीसंदर्भात आहे. सदर दाव्यातील निशाणी क्रमांक ८ वरील बेलिफ यांचे अहवालाचे अवलोकन केले असता असे दिसून

येते की, प्रतिवादी क्रमांक ५ हे मयत झाले आहेत. तसेच, वादींनी सदर प्रतिवादी क्रमांक ५ हे मयत झालेने त्यांचे विरूध्द कोणतीही दाद मागावयाची नाही असे कथन सदर अर्जात केले आहे. सबब, दाव्याचे सरनाम्यातून नमुद प्रतिवादी क्रमांक ५ यांचे नाव कमी करण्यात येऊन त्यांच्या नावासमोर "मयत" असा उल्लेख करून त्याप्रमाणे दुरूस्ती करणे न्यायोचित होईल व वादी व प्रतिवादी यांच्यामधील सर्व वादप्रश्न एकाच दाव्यात एकाच वेळी कायदेशीर गुंतागुत न वाढवता निकाली काढणेस न्यायालयास मदत होईल. सबब खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे:–

**:: <u>आदेश</u> ::**

निशाणी क्रमांक १२ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

सही/–
(श्रीमती ए. वाय. शेख)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, न्यायालय
दहिवडी.

दिनांक – २८/१०/२०२५
ठिकाण – दहिवडी